दाखल दिनांक :— १९/०७/२०१८
नोंदणी दिनांक :— १९/०७/२०१८
निकाल दिनांक :— ०५/०२/२०२०
कालावधी :— ०१व. ०६म. १४दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पिंपरी चिंचवड महानगरपालिका, आकुर्डी, पुणे यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी : श्रीमती व्ही. आर. माने)**

**फौ.ख.क.०१/२०१८** **निशाणी क.:—२४.**

महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस अधिकारी
वाकड पोलीस स्टेशन. .... **अभियोग पक्ष.**

**—विरुध्द—**

प्रभाकर बुधा साळुंखे
वय: ४५ वर्षे,
रा: पिंपळे गुरव, ता. हवेली,
जि. पुणे. .... **आरोपी.**

---

अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता — गैरहजर.
आरोपीतर्फे विधिज्ञ — अॅड. श्री. के. पी. बकाल.

---

## न्यायनिर्णय
**(दिनांक ०५ फेब्रुवारी २०२० रोजी घोषित)**

१. सदर खटला आरोपीविरुध्द् सार्वजनिक मालमत्ता विद्रुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियमचे कलम ३ च्या दंडनीय अपराधाकरीता चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, आरोपीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता वाकड रोड परीसर

येथे विदयुत पोलवर “ADMISSION OPEN KIDZEE Chaudhari Park, Wakad” या नावाचे व मोबाईल क्र. ८५५४९९००४४ ९८२३९१०१५३ असे लिहीलेले विनापरवाना जाहिरात फलक लावले. दिनांक २५/०६/२०१८ रोजी सदरचे फलक काढुन घेणेबाबत आरोपीला लेखी नोटीस दिली. दिनांक ०४/०७/२०१८ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे परवाना निरीक्षक श्री. ग्यानचंद हरी भाट यांनी सदर घटनास्थळाची पाहणी केली असता आरोपीने विनापरवाना जाहिरात फलक काढुन घेतले नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी त्याबाबत पंचनामा तयार केला व आरोपीविरुध्द् पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्यादीच्या अनुषंगाने गुन्हा क्र.५४९/२०१८ आरोपीविरूध्द नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी एस. एस. रासकर, पोलीस हवालदार वाकड पोलीस स्टेशन यांनी तपासादरम्यान घटनास्थळाला भेट दिली, साक्षीदारांकडे चौकशी करून त्यांची तपास टिपणे नोंदविली व आरोपीविरुध्द् न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** दोषारोपपत्रातील आरोपांच्या अनुषंगाने माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द निशाणी क्र.१२ नुसार सार्वजनिक मालमत्ता विद्रुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियमचे कलम ३ अन्वये आरोप निश्चित केला. त्यातील मजकुर त्याला संक्षिप्तपणे समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा नाकबुल केल्याने त्याच्याविरूध्द खटला पुढे चालविण्यात आला.

**५.** आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा समोर आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) नुसार निशाणी क्र.२३ वर जबाब नोंदविण्यात आला. आरोपीने त्याच्याविरूध्द खोटी केस केल्याचे सांगितले.

**६.** अभियोग पक्षाच्या कथनावरून खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यावर मी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४/०७/२०१८ रोजी आरोपीने वाकड रोड परीसर येथे पिं.चिं.म.न.पा. ची पुर्व परवानगी न घेता विनापरवाना विदयुत पोलवर “ADMISSION OPEN KIDZEE Chaudhari Park, Wakad” या नावाचे व मोबाईल क्र. ८५५४९९००४४ ९८२३९१०१५३ असे लिहीलेले जाहिरात फलक लावल्यामुळे आरोपीला विनापरवाना लावलेला जाहिरात फलक काढुन टाकण्याकरीता नोटीस मिळाल्यानंतरही त्याने नोटीसीची पुर्तता केली नसल्याने सार्वजनिक मालमत्तेचे विरूपण केले असे अभियोग पक्षाने शाबित केले काय?... | ...नकारार्थी. |
| २. | आदेश काय ?... | ...आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता :—**

७. आरोपीविरूध्दचा आरोप शाबित करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्षीदार क्र.१—ग्यानचंद हरी भाट, फिर्यादी (नि.१२), साक्षीदार क्र.२—सुरेश गेणभाऊ पोकळे (नि.२१), साक्षीदार क्र.३—सुरेश सोमनाथ रासकर, तपासी अंमलदार (नि.२२) वर तपासले. उर्वरीत साक्षीदारांपैकी कोणीही हजर झाले नाही. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत प्रकरण आणखी प्रलंबित ठेवून काहीही निष्पन्न होणार नाही असे निदर्शनास आल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. बचाव पक्षाच्या वतीने कोणाचीही साक्ष नोंदविण्यात आली नाही.

८. अभियोग पक्षाने तोंडी पुराव्या व्यतिरीक्त पंचनामा (नि.१३), आयुक्तांचे आदेशाची प्रत (नि.१४, १५), फिर्यादी अर्ज (नि.१६), फिर्यादी

जबाब (नि.१७), पहिली खबर (नि.१८), नोटीस (नि.१९) इ. कागदोपत्री पुरावाही दाखल केला आहे.

९. आरोपीविरूध्दचा आरोप शाबित करणेसाठी, आरोपीने वाकड रोड परिसर येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची जाहिरात फलक लावणेकरीताची परवानगी न घेता विदयुत पोलवर “ADMISSION OPEN KIDZEE Chaudhari Park, Wakad” या नावाचे व मोबाईल क्र. ८५५४९९००४४ ९८२३९१०१५३ असे लिहीलेले” विनापरवाना जाहिरात फलक लावला. सदर जाहिरात फलक काढुन टाकण्यासाठी नोटीस देण्यात आली. परंतु, आरोपीने नोटीसीचे पालन केले नाही ही गोष्ट अभियोग पक्षाने शाबित करणे गरजेचे आहे.

१०. फिर्यादी भाट यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कार्यरत असताना दिनांक ०४/०७/२०१८ रोजी आरोपीने वाकड रोड परीसर येथे विदयुत पोलवर दोन बाय तीनचे किडझी क्लासेस असे लिहीलेले महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता जाहिरात फलक लावल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी त्याबाबत निशाणी क्र.१३ नुसार पंचनामा तयार केला. आरोपीला सदर विनापरवाना जाहिरात फलक काढुन टाकण्याकरीता निशाणी क्र.१९ नुसार नोटीस दिली. परंतु, आरोपीने नोटीसीचे पालन केले नाही म्हणून त्यांनी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

११. फिर्यादीच्या कथनाला दुजोरा मिळण्याकरीता अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२—सुरेश पोकळे यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, ते फिर्यादीसोबत विनापरवाना लावलेल्या फलकाचा सर्वे करण्यास गेले होते. त्यांच्या समक्ष फिर्यादीने त्याबाबत पंचनामा तयार केला. त्याशिवाय साक्षीदार क्र.३—सुरेश रासकर यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळाला भेट दिली, साक्षीदारांकडे चौकशी करून त्यांची तपास टिपणे नोंदविली व आरोपीविरुध्द्

न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या सर्व साक्षीदारांनी त्यांच्या उलट तपासात जाहिरात फलकावरील मजकुर पंचनाम्यामध्ये नमुद नसल्याचे मान्य केले आहे. ज्या सार्वजनिक मिळकतीवर जाहिरात फलक लावला त्या मिळकतीचा सर्वे क्रमांक, गट क्रमांक, प्लॉट क्रमांक सांगता येत नाही. तसेच घटनास्थळाच्या आजुबाजूच्या लोकांचे जबाब नोंदविले नाहीत असे मान्य केले आहे.

१२. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी व त्यांचे सहकारी वाकड रोड परिसरात पाहणी करण्यास गेले असता त्यांना आरोपीने सार्वजनिक विदयुत पोलवर दोन बाय तीनचा किडझी क्लासेस असा मजकुर लिहीलेला विनापरवाना जाहिरात फलक लावल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार त्यांनी कार्यवाही केली असली तरी निशाणी क्र.१३ वर दाखल असणा–या पंचनाम्याचे व निशाणी क्र.१९ वरील नोटीसचे अवलोकन केले असता सदर पंचनाम्यामध्ये व नोटीसमध्ये “ADMISSION OPEN KIDZEE Chaudhari Park, Wakad” या नावाचा व मोबाईल क्र. ८५५४९९००४४ ९८२३९१०१५३ असे लिहीलेला जाहिरात फलक होता हा मजकुर नमुद नाही. त्यामुळे यातील फिर्यादी व पंच साक्षीदारांनी नक्की कोणत्या जाहिरात फलकाचा पंचनामा केला, कोणते जाहिरात फलक काढुन घेण्याकरीता आरोपीला नोटीस दिली याचा बोध होत नाही. तसेच सदर साक्षीदारांनी ज्या जाहिरात फलकाचा पंचनामा केला तो जाहीरात फलक या आरोपीनेच विदयुत पोलवर लावला आहे याबाबतचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभिलेखावर उपलब्ध नाही. सबब तो जाहिरात फलक या आरोपीच्याच मालकीचा असून त्यानेच त्या विदयुत पोलवर लावला ही बाब शाबित होत नाही. याशिवाय कोणताही स्वतंत्र साक्षीदार प्रकरणात उपलब्ध नाही. त्यामुळे सदर ठिकाणी आरोपीने विनापरवानगी लोकांच्या नजरेस पडेल अशा सार्वजनिक विदयुत पोलवर जाहिरात फलक लावला ही बाब शाबित करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरले आहेत.

१३. अभियोग पक्षाच्या तिन्हीही साक्षीदारांनी त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या

अनुषंगाने साक्ष दिलेली असली तरी सबळ पुराव्याअभावी त्यांची साक्ष ही, आरोपीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची परवानगी न घेता विनापरवाना जाहिरात फलक लावल्याबाबतचा आरोप शाबित होण्यास पुरेशी आहे असे वाटत नाही. परिणामी आरोपीने विनापरवाना जाहिरात फलक लावल्याबाबतचा आरोप वाजवी संशयाच्या पलिकडे शाबित होण्याइतपत पुरावा प्रकरणात उपलब्ध नसल्याने आरोपी हा त्याच्याविरूध्दच्या आरोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. करीता मुद्दा क्र.१ वरील निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे. मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

**१.** आरोपी प्रभाकर बुधा साळुंखे यास सार्वजनिक मालमत्ता विद्रुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियमचे कलम ३ या दंडनीय अपराधातुन फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे पुर्वीचे जामीनाचे व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रूपये १०,०००/– चा जामीन व वैयक्तिक बंधपत्र दयावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

दिनांक : ०५/०२/२०२०

(श्रीमती व्ही. आर. माने)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(पिं.चिं.म.न.पा.), आकुर्डी, पुणे.

# CERTIFICATE

“I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. S. S. Gupte |
| Court Name | :- | Smt. V. R. Mane<br>(J.M.F.C.) Civil and Criminal Court<br>(P.C.M.C.), Akurdi, Pune. |
| Date | :- | 05/02/2020 |
| Judgment signed by presiding officer on | :- | 05/02/2020 |
| Judgment uploaded on | :- | 05/02/2020 |